लोकसत्ता
शनिवार, २६ जुलै २०१४

## उद्योजकता विकास परिषद संपन्न

# 'नगरचे औद्योगिक मागासलेपण दूर करू'



आयएमएसच्या वतीने शुक्रवारी आयोजित करण्यात आलेल्या उद्योजकता विकास परिषदेत जिल्ह्यातील नऊ उद्योजकांचा आदर्श पुरस्कार देऊन एसएमईचे अध्यक्ष चंद्रकांत साळुंके यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हिवाळे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष एन. एम. ॲनस्टिन होते. संस्थेचे सरसंचालक डॉ. एस. बी. कोलते, संचालक एम. बी. मेहता, 'आमी'चे अध्यक्ष अशोक सोनवणे आदी या वेळी उपस्थित होते. (छाया : जितेंद्र अग्रवाल, नगर)

प्रतिनिधी, नगर

**नगरच्या औद्योगिक** विकासाबाबत चिंता व्यक्त करतानाच यात आता स्मॉल अँड मीडियम बिझनेस चेंबर ऑफ इंडियाने (एसएमई) लक्ष घातले आहे. लवकरच त्यातील त्रुटी शोधून या खुंटलेल्या विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करू, असे संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत साळुंके यांनी येथे सांगितले. उद्योजकता विकासासाठीच संस्था कार्यरत आहे असे ते म्हणाले.

हिवाळे शिक्षण संस्थेच्या आयएमएसच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हा उद्योजकता विकास परिषदेचे उद्घाटन साळुंके यांच्या हस्ते झाले. या वेळी ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी हिवाळे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष एन. एम. ॲनस्टिन होते. संस्थेचे सरसंचालक डॉ. एस. बी. कोलते, संचालक एम. बी. मेहता, 'आमी'चे अध्यक्ष अशोक सोनवणे आदी या वेळी उपस्थित होते. आयएमएसचा या वेळी एसएमईशी भागीदारी करार झाला. साळुंके व कोलते यांनी या करारवर सह्या केल्या.

साळुंके म्हणाले, देशाचा उत्तर-पूर्व भाग वगळता भारतासह चाळीस देशांत एसएमई कार्यरत आहे. मुख्यत्वे उद्योगांच्या व्यवसायात वाढ, नवे तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय बाजारपेठ व छोट्या आणि मोठ्या उद्योगांसमोरील अडचणी सोडवण्यासाठी संस्था कार्यरत आहेत. ग्रामीण भागातील उद्योगांच्या वाढीला आता संस्थेने प्राधान्य दिले आहे. मुख्यत्वे स्थानिक उद्योजकांना एकत्र करून त्यांच्या अडचणी सोडवण्याचा प्रयत्न आहे, असे साळुंके यांनी सांगितले.

ॲनस्टिन यांनी हिवाळे शिक्षण संस्थेची माहिती दिली. ते म्हणाले, गुणवत्तेला संस्थेत सर्वाधिक महत्त्व आहे. संस्थेचे द्रष्टे संस्थापक भा. पा. हिवाळे यांचे हे जन्मशताब्दी वर्ष असून ते विविध उपक्रमांनी साजरे करण्यात येणार आहे.

सर्वश्री सतीश गवळी, मधुकर शिंदे, दीपक लांडगे, संजय पारनाईक, मिलिंद कुलकर्णी व कविता जाधव, जया औटी, मधुबाला चोरडिया, मंदा निमसे या महिला उद्योजकांचा या वेळी आदर्श उद्योजकता पुरस्काराने गौरव करण्यात आला.

डॉ. कोलते यांनी प्रास्ताविकात संस्थेची माहिती दिली. डॉ. मेहता यांनी स्वागत केले. प्रा. ऋचा तांदुळवाडकर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मेधा कुलकर्णी यांनी आभार मानले. उद्घाटनानंतर उद्योगांशी संबंधित विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने झाली.

### नगरबद्दल चिंता

कार्यक्रमानंतर पत्रकारांशी बोलताना साळुंके यांनी नगरच्या औद्योगिक मागासलेपणाबद्दल चिंता व्यक्त केली. ते म्हणाले, पुणे, नाशिक, ठाणे औरंगाबाद या शेजारी शहरांच्या तुलनेत नगर मागे का पडले याचा अभ्यास आता संस्थेने सुरू केला असून, त्याची कारणे शोधून ती दूर करण्यात येणार आहेत. नाशिकनंतर आता नगरवरच लक्ष केंद्रित केले आहे. सुपे औद्योगिक वसाहतीत मोठे उद्योग आणता येतील, मात्र ते छोट्या उद्योगांना पूरक असले पाहिजे असे ते म्हणाले.